# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08 / 04 / 2023 (शनिवार) दुपार

## चोरी

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मुरलीधर मंदीराजवळ सावनेर येथे दिनांक २५/०३/२०२३ चे १२/०० वा. ते दिनांक ०६/०४/२०२३ चे ९/३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. दिपा आतिश विंचुरकर, वय २८ वर्ष, रा. प्रकाश वाघमारे यांचे घरी किरायाने मुरलीधर मंदीराजवळ सावनेर हिचे पतीने घरचे काम करण्यासाठी दोन महीन्या करिता मिना बावने, रा. रजनी हजारे यांचे घरी किरायाने राहणारी वार्ड क्र. १३ किल्लापूरा सावनेर यांना महीना २०००/—रू देवून ठेवले होते दि. २/०४/२०२३ रोजी फिर्यादीची प्रकृती चांगली झाल्याने मिना बावने यांना कामावरून बंद केले. फिर्यादीकडील १) ७ ग्रॅम सोन्याचे झुमके किंमती अंदाजे २०,०००/— रू. २) बेड रूममध्ये लाकडी टेबलचे ड्रॉव्हर मध्ये डब्बीत ठेवलेले २ ग्रॅम सोन्याचे कानातील रिंग किंमती अंदाजे ५०००/—रू. असा एकूण २५०००/—रूपयाचा मुद्देमाल हा फिर्यादीचे घरी काम करणारी मिना बावने हिने चोरून नेले असावे असा फिर्यादीचे संशयावरून पोलीस स्टेशन सावनेर येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३८१ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/८२१ सुरेंद्र वासनिक मो. नं. ९८२३१९६८२१ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक ०७/०४/२०२३ चे १९.३० वा. दरम्यान फिर्यादी/पिडीता वय २८ वर्ष ही जॉब वरून बस ने फेटरी गोडाउन चौक येथे आली. रस्ता क्रॉस केल्या नंतर माहुरझरी जाणाऱ्या रोड कडे जात असता मोटरसायकलवर तीन ईसम बसुन फिर्यादी जवळ आले. त्यापैकी मध्ये बसलेला आरोपी नामे— अंशुल ढोणे, रा. फेटरी याने फिर्यादीचा डावा हात पकडुन बेबी डार्लिंग असे म्हटले तेव्हा फिर्यादीने आपला हात झटक्याने सोडविला. तेव्हा फिर्यादीचा भाऊ नामे— सागर फिर्यादीला घेण्या करीता जवळ आला व आरोपी अंशुल ढोणे याला म्हटले की तु माझ्या बहिणीचा हात का पकडला व बेबी डार्लिंग का म्हटले असे म्हटल्यावर आरोपीने फिर्यादी व तिचे भावा सोबत झगडा भांडण करून शिवीगाळी केली व पाहुन घेण्याची धमकी दिली. आरोपीने फिर्यादीचे हात पकडुन बेबी डॉर्लिंग म्हटल्याने फिर्यादीचे मनात लज्जा निर्माण होईल असे कृत्य करून फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ५०४, ५०६ भा.द.वि कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ३९७ कामळी मों. ९९२३१२३३९७ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर